ज्ञान तपस्वी प्राचार्य (नि.) अद्वयानंद गळतगे



शशिकांत ओक

मान्यवर लेखक आपले लेखन कसे करतात? त्यासाठी ते पुर्व तयारी कशी करतात? वेगवेगळे देशविदेशीतील संदर्भ ग्रंथ मिळवून त्यांतील पान व प्रकरण क्रमांकासह त्यांना ते कसे हाताळायला लागतात? अचूकपणे हव्या त्या वेळी त्यांना ते ते संदर्भ कसे आठवणीत राहतात? इंग्रजीतील मोठमोठ्या परिच्छेदांचे मराठीत अनुवाद करताना त्यांना सारखे इंग्रजी ते मराठी शब्दकोशाची मदत लागते का? त्यांच्या लेखनाच्या हस्तलिखिताच्या प्रक्रियेपासून ते नियतकालिकात किंवा पुस्तक रूपाने प्रकाशित होईपर्यंत काय काय त्यांना करावे लागते? वगैरे प्रश्न सामान्य वाचकांना पडतात.


प्रा. अद्वयानंद गळतगे सरांना ८ ऑगस्ट २०२० ला ८९वे वर्ष लागले. त्यांच्या या वयात त्यांचा दिनक्रम काय असतो वगैरे विचारणा मला अनेकदा विचारात पाडत होत्या. एकदा मी बेळगाविहून परतताना मुद्दाम निपाणीला थांबून त्यांची भेट घ्यायला एक रात्र राहिलो होतो. त्यांचे चिरंजीव प्रो. वेदांत गळतगे हे निपाणीत मॅथ्स व सायन्सचे मान्यवर प्रोफेसर आहेत. त्यांच्याकडे ते मला भेटायला म्हणून मुद्दाम आपल्या मळ्यातील फार्म हाऊस वरून आले होते. त्यावेळी त्यांनी मला प्रज्ञालोक मधील त्यांचे लेख वाचायला दिले होते. ते नंतर मिपावर सादर झाला आहे.

आता सध्या काय लेखन कार्य चालू आहे असे विचारता विषय मनात आहेत. पाहू कधी लिहिणे होईल ते. असे ते म्हणाल्याचे आठवते. त्यानंतर त्यांनी लेखनाला सुरवात केल्याचे कळले. मी एकदा त्यांना मी आपल्याला काय मदत करू शकतो म्हणून विचारणा केली, 'तुम्ही काय मदत करणार हो?' असे त्यांच्या कानडी लहेज्यात ते म्हणाले. सर तुम्ही लिहिलेल्या हस्तलिखिताला मराठीत टायपिंग करून दिले तर चालेल का? मी धीटपणे विचारले व नंतर त्यांच्या नातवाने व्हॉट्स ॲपवर त्यांच्या हस्तलिखिताच्या पानांचे फोटो पाठवायला सुरवात केली.

आपल्या बोलण्याचे पटापट लिहून मिळायची सोय असते म्हणून Speechneots.com या ॲपला मी वापरत असे. त्यात मराठी, हिंदी व इंग्रजीत आपले बोललेले लिहून मिळे. पहाटे फिरायच्या व्यायामाबरोबर ज्या विषयावर लिहायचे आहे, त्याला धरून चालता चालता बोलून कच्चा मसूदा तयार करीत असे व नंतर त्याला विराम चिन्हे व चुकांना दुरुस्त करून बराच वेळ वाचवत असे. सरांच्या हस्त लिखिताला लॅपटॉपवर पाहून टॅबवर swiftkeyboard.com पटापट लिहायला सोपे गेले.

शिवाय एका क्लिकने भाषा बदलून सरांच्या इंग्रजी लेखनातील बोजड शब्दांचे स्पेलिंग आपोआप सुधारुन मिळायची सोय पण त्यात आहे. त्यामुळे मला सरांच्या हस्तलिखिताला टाईप करायला सुरवातीला जरी जड गेले तरी नंतर हात बसला. विराम चिन्हात कुठे एकेरी तर कुठे दुहेरी अवतरणे, इंग्रजीत काही शब्द, वाक्ये नेमकी अधोरेखित करून ठेवणे, पाश्चात्य लेखकांच्या पुस्तकातील उताऱ्यानंतर त्यांच्या पानांचे क्रमांक pp. असे देताना त्यांनी पाळलेले कटाक्ष थक्क करून जात असत. कुठेही खाडाखोड नाही. सलग एकटाकी लेखन तेही अशा विषयावर की त्यातून त्यांच्या पांडित्याचे, गहन अभ्यासाचे दर्शन होते. पल्लेदार वाक्ये, आपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ दिलेले चपखल पाश्चिमात्य वैज्ञानिकांचे व भारतीय तत्वज्ञानीेच्या लेखनाचे पुरावे, संस्कृत भाषेतील गहन श्लोकांचे मराठीत सुगम रुपांतर ही त्यांच्या लेखन कलेतील वैशिष्ट्ये जागोजाग दिसतात. एकेकाळी निख्खळ विज्ञानवादी असलेले नंतर बुद्धिवादाच्या तोकडेपणाची जाणीव होऊन त्यांनी त्यावर प्रहार केले. आपल्या वैचारिक बैठकीला प्राचीन भारतीय तत्वज्ञानच उपयोगी आहे. असे त्यांनी आवर्जून प्रतिपादन केले आहे. प्रा. अद्वयानंद गळतगे हे मिपाकरांना माहितीतले व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या लेखनातून निर्माण झालेले अनेक धागे त्यांच्या खणखणीत वैचारिकतेची साक्ष देतात.

सरांचा पहिला लेख नंतर एप्रिल २०२०च्या प्रज्ञालोक मधून छापून आला. मी तयार केलेल्या टायपिंग लेखनाला नंतर त्यांच्या नातवाने सरांना प्रिंट आऊट काढून वाचायला दिले. त्यात सरांनी काही चुका दाखवून नातवाकडून दुरुस्त करून घेतल्या. त्यांच्या नातवाला मराठीत टायपिंग करायची आवड निर्माण झाली.



डार्विनचा उत्क्रातिवाद सिद्धांत बरोबर आहे काय?

लेखक: प्राचार्य अद्यानंद गळतगे, भोज, जिल्हा- बेळगाव, भ्रमणध्वनी: 9902002585.

... तरच डार्विनचा उत्क्रांतिवाद खरा मानता येईल

एकोणिसाव्या शतकात रॉबर्ट हुदिन व इतर अनेक त्या काळातील जादूगार मृतात्म्यांना बोलवल्या जाणाऱ्या 'सीयन्स 'नावाच्या खास बैठकीमध्ये हे मृतात्म्याकडून केले जाणारे (टेबल आपोआप अंतराळी उचलले जाणे इत्यादी) चमत्कार स्वतःच्या जादूने करून दाखवण्याबद्दल प्रसिद्ध होते. लंडनच्या मृतात्मवादी (Spiritualist) संघाचा ऑनररी सेक्रेटरी अल्गेर्नॉन जॉय याने त्यांना आव्हान दिले की की आमच्या अटीखाली मृतात्मे करीत असलेले प्रकार करून दाखवावेत व आमचे त्यासाठीचे एक सहस्त्र पौंडाचे खास बक्षीस जिंकावे. जॉयचे ते आव्हान अर्थात कोणत्याही जादूगाराने स्वीकारले नाही. स्वीकारणे शक्य नव्हते. कारण त्यांची जादू मृतात्मे करीत असलेली खरी जादू नव्हती. ती प्रेक्षकांची फसवणूक होती. तथापि त्यांचे म्हणणे असे होते की मृतात्म्याच्या नावाखाली केले जाणारे सर्व चमत्कार हीसुद्धा फसवणूक असते, आणि तेच आम्ही आमच्या 'युक्त्या' वापरून सिद्ध करून दाखवीत असतो. यावर ब्रह्म विज्ञानवादी मॅडम एच. पी. ब्लॅव्हेट्स्की यांनी त्यांना असे आव्हान दिले : 'सीयन्स' च्या अंधाऱ्या खोलीत मृतात्म्यांचे चमत्कार बाजूला राहू द्या. भारतीय जादूगार दिवसा पूर्ण प्रकाशात जे जादूचे प्रयोग करतात ते त्याच परिस्थितीत करून दाखवावे. भारतीय जादूगार करीत असलेल्या अनेक जादूच्या प्रयोगांपैकी तीन प्रयोग पाश्चिमात्य जादूगारांसाठी आव्हान म्हणून निवडले होते(हे तीन्ही प्रयोग एका भारतीय जादूगाराने प्रिन्स ऑफ वेल्स व त्यांचे सेवक लोक यांच्यापुढे इंग्लंडमध्ये काही दिवसापूर्वी प्रत्यक्षात करून दाखवले होते.) व ब्लॅव्हॅट्स्कीनी निवडलेले व प्रिन्स ऑफ वेल्सपुढे भारतीय जादूगाराने करून दाखवलेले ते तीन प्रयोग असे:

१. संशयवादी प्रेक्षकाने आपल्या मुठीत घट्ट धरलेल्या रुपाया विषारी नागसापात रूपांतर करणे तो नाग विषारी असल्याची त्याच्या दातांची परीक्षा करून नंतर खात्री करणे.

२. प्रेक्षकांनीच निवडलेले कोणत्याही फळझाडाचे बी त्यानेच आणलेल्या फुलपात्रात पेरून त्यापासून रोपटे उगवणे, ते वाढवणे व त्याला फळे लागणे, ही गोष्ट पंधरा मिनिटात करून दाखवणे.

3 ज्यांच्या मुठी जमिनीत रोवलेल्या आहेत व टोके आकाशाकडे वर

सरांच्या हस्तलेखनाला टाईप केलेले एक पान

या लेखमालेतील पाच भागापर्यंत सरांचे लिखाण झाले आहे. यापुढील भागावर ते लेखनकार्य करत आहेत.

डार्विनचा उत्क्रांतिवादी सिध्दांत खरा आहे काय?

प्राचार्य अद्भुतानंद मळतगे, भोज, [illegible] जि. बेळगाव, (कर्नाटक)
फो. ९९०२००२५६५

...तरच डार्विनचा उत्क्रांतिवाद खरा मानता येईल

एकोणिसाव्या शतकात रॉबर्ट हुदिन व हॅरी [illegible] त्या काळातील जादूगार अध्यात्मवाद्यांना बोलावल्या जाणाऱ्या 'सीअन्स' नावाच्या खास बैठकांमध्ये मृतात्म्यांकडून केले जाणारे (टेबल आपोआप अंतराळी उचलले जाणे इत्यादि) चमत्कार स्वतःच्या जादूने करून दाखवण्याबद्दल प्रसिध्द होते. लंडनच्या मृतात्मवादी (spiritualist) संघाचा ऑनररी सेक्रेटरी [illegible] जॉय याने त्यांना आव्हान दिले की 'आमच्या अशिक्षित मृतात्मे करीत असलेले प्रकार करून दाखवावेत व आमचे त्यासाठीचे एक सहस्र पौंडाचे खास बक्षीस जिंकावे. जॉयचे ते आव्हान अर्थात कोणत्याही जादूगाराने स्वीकारले नाही. स्वीकारणे शक्य नव्हते. कारण त्यांची जादू मृतात्मे करीत असलेली खरी जादू नव्हती. ती प्रेक्षकांची फसवणूक होती. तथापि त्यांचे म्हणणे असे होते की मृतात्म्यांच्या नावाखाली केले जाणारे सर्व चमत्कार हीसुध्दा फसवणूकच असते; आणि तेच आम्ही आमच्या 'युक्त्या' वापरून सिध्द करून दाखवीत असतो. नंतर ब्रह्मविज्ञानवादी मॅडम एच. पी. ब्लॅव्हेट्स्की यांनी त्यांना असे आव्हान दिले: 'सीअन्स'च्या अंधाऱ्या खोलीतील मृतात्म्यांचे चमत्कार बाजूला राहू द्या. भारतीय जादूगार दिवसा पूर्ण प्रकाशात जे जादूचे प्रयोग करतात ते त्याच परिस्थितीत करून दाखवावेत. भारतीय जादूगार करीत असलेल्या अनेक जादूच्या प्रयोगांपैकी तीन प्रयोग पाश्चिमात्य जादूगारांसाठी ब्लॅव्हेट्स्कींनी आव्हान म्हणून निवडले होते. (हे तीन्ही प्रयोग एका भारतीय जादूगाराने प्रिन्स ऑफ वेल्स व त्याचे ~~सेवक~~ लोक यांच्यापुढे इंग्लंडमध्ये काही दिवसांपूर्वी प्रत्यक्षात करून दाखवले होते.) ब्लॅव्हेट्स्कींनी निवडलेले, व प्रिन्स ऑफ वेल्सपुढे भारतीय जादूगाराने करून दाखवलेले, ते तीन प्रयोग असे: एक: संशयवादी प्रेक्षकाने आपल्या मुठीत घट्ट धरलेला रुपयाचा विषारी नागसापात रूपांतर करणे, तो नागसाप विषारी असल्याची त्याच्या दातांची परीक्षा करून नंतर [illegible] करणे. दोन: प्रेक्षकानेच निवडलेले कोणत्याही फळझाडाचे बी त्यानेच [illegible] या फुलपात्रात पेरून त्यापासून रोपटे उगवणे, ते वाढणे व त्याला फळे लागणे, [illegible] गोष्ट पंधरा मिनिटात ~~करणे~~ करून दाखवणे. तीन: ज्यांच्या मुठी जमिनीत रोवलेल्या आहेत व टोके आकाशाकडे वर

सरांच्या हस्तलेखनाचा नमुना

[illegible]

हे प्रयोग डॉर्विनचा उत्क्रांतिवाद खोटा कसे ठरवितात


[illegible]


---


* "The purpose manifested in evolution, whether in adaptation, specialisation or biological progress, is only ... a product of blind forces." (Evolution: The Modern Synthesis – Julian Huxley 1963, p. 576.) "उत्क्रांतीमध्ये दिसून येणारा हेतू, मग तो परिस्थितीशी जुळवून घेणे असो, नवीन जाती निर्माण करणे असो, अगर जैविक प्रगती करणे असो, केवळ आंधळ्या शक्तींमुळे घडून येतो." [illegible] निष्कर्ष तज्ज्ञ म्हणतात.

पान तीन वरील *फूटनोट


प्रा. अद्वयानंद गळतगे यांची लेखन संपदा-








"चमत्कारचे वास्तव आणि चमत्काराचे विज्ञान"




विज्ञान आणि
चमत्कार
लेखक